लातूर

# भूकंप

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : मंगळवार – ३ ऑक्टोबर २०२३

वर्ष – ३७ वे

अंक – १७७

पाने – ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com

RNI No. MAHMAR/2012/42770

☎ : –9422072823,251822

epaper.dainikbhukamp.com



लातूर - नाशिक

दररोज

रात्री ८.३० वाजता

GET IT ON Google Play

VISHWA TRAVELS APP

विश्व ट्रॅव्हल्स

२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.

संपर्क : (02382) 242790, 254002, 249329,

88888 45403, 88888 45404.

जिथं प्रवासाची व्याख्याच बदलते

Online Booking : www.vishwatravels.in


## संपादकीय......

### रूग्णांचे मृत्यू : गुन्हे दाखल करा

सर्वसामान्य जनतेच्या जिवाशी खेळ करून सरकारी रूग्णालये यंत्रणा त्यांचा बळी घेत आहे. नांदेड येथील शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात २४ तासात २४ जणांचा मृत्यू झाला. त्यातील वेदनादायी बाब अशी कि एक ते दोन दिवसाचे वय असणाऱ्या १२ नवजात बालकांचा मृत्यू झाला आहे. एक–दोन ज्येष्ठ व बाकीचे मध्यमवयीन पण गरिबा घरचे आहेत. २४ तासात २४ जणांचा बळी घेतला, हा अग्रलेख लिहत असताना २४ तासानंतरही ६ ते ७ तासामध्ये आणखी ७ जणांचा असे एकूण ३१ जणांचा मृत्यू नांदेडच्या शासकीय वैद्यकीय रूग्णालयात झाला आहे. यात नवजात बालकं मोठ्या प्रमाणात आहेत. काही दिवसापूर्वी ठाण्याच्या शासकीय रूग्णालयात एका दिवसात १७ जणांचा बळी गेला होता. त्यानंतर नांदेड मध्ये ३१ जणांचा बळी घेतला गेला. या घटनेनंतर राजकारणी 'नक्राश्रू' ढाळत आहेत. आज जे सत्तेत आहेत ते या मृत्यूशी जबाबदार आहेतच पण जे विरोधात आहेत, त्यांची सत्ता असताना शासकीय रूगणालयातून एकाही निष्पापाचा बळी गेला नाही, असे नाहीच! राज्यात आघाडी सरकार असताना भंडारा येथील शासकीय रूग्णालयात 10 नवजात बालकं अक्षरशा होरपळून ठार झाली होती. वाईट याचे वाटते की, सत्ताधारी असो वा विरोधक दोन्ही बाजूचे नेत्यांनी कधी ना कधी सत्ता उपभोगली आहे. सत्तेवर आरूढ प्रत्येक सरकारला मात्र सर्वसामान्यांच्या, गोरगरिबांच्या जिवाशी काहीच लेणंदेणं नसते, बरे अशी एखादी दुर्घटना घडते त्याची पुनरावृत्ती होणार नाही याची खबरदारी घेणे शासनकर्त्यांची जबाबदारी असते. पण, सत्ताधारी हे सत्ता उपभोगण्यातच व्यस्त आहेत. त्यांची भाषा लोक कल्याणाची आणि वर्तणूक मात्र मारेकऱ्यांची अशीच राहत आली आहे. एक–दोन दिवसाचे वय असलेली १२–१४ बालकं शासकीय रूग्णालयाच्या निव्वळ हलगर्जीपणातून बळी जातात. तेंव्हा वाटते खरेच या विश्वात 'ईश्वर' नावाची यंत्रणा नाही, कारण एवढे दुर्वतन यांच्या हातून होत असताना शासन यंत्रणेतील नेते, प्रशासनातील अधिकारी यांचं काहीच वाकडं होत नाही. नांदेडच्या शासकीय रूग्णालयातील दुर्घटना आणि ३० तासात ३१ जणांचा बळी याबाबत सर्वत्र टिका होत आहे. शासन आरोग्याच्या संदर्भात उगीचच स्वतःच्या 'टिऱ्या' बडवून घेऊन गोरगरिबांच्या आरोग्यासाठी एवढ्या कोटीच्या योजना, मोफत उपचार, औषधाला पैसे कमी पडू देणार नाही, असे म्हणत राहते. प्रत्यक्षात सरकारी रूग्णालयात गोर–गरिबांची अक्षरशा फसवणूक होत आहे. सरकारीमध्ये उपचारच मिळत नाहीत. खासगीत उपचार घेण्याची ऐपत नसते कर्तव्यावर असलेले डॉक्टर व ईतर 'स्टाफ' सरकारी रूग्णालयात येणारा रूग्ण म्हणजे आपला मुलगा, मुलगी, आई–वडील, बहिण, भाऊ मानतच नाहीत. त्यामुळे त्यांना काहीच वाटत नाही. शिक्षण/आरोग्य याची जबाबदारी सरकारने घ्यायला हवी. शासन या दोन्हीसाठी कोट्यावधीचा खर्च करते पण परिणाम शुन्य असतो. नांदेडच्या शासकीय रूग्णालयात 'औषधी'च उपलब्ध नसल्याने रूग्णांचा मृत्यू झाला, हे सत्य आहे. हा प्रकार भीषण आहे. तसे रूग्णालयाच्या अधिष्ठातांनी आमचेकडे अत्यावस्थ असलेले रूग्ण येतात, आमच्या रूग्णालयात १२ बालकांचा मृत्यू हा नैसर्गीक आणि ईतरांचा विविध आजारातून झाला. आमच्याकडे पुरेसा स्टाफ आहे. औषधी आहेत, असे म्हटले आहे. हे साफ खोटे आहे किंवा या भयानक दुर्घटनेनंतर शासनाने अधिष्ठातांवर दबाव टाकला असण्याची शक्यता आहे. माजी मुख्यमंत्री व नांदेड जिल्ह्यातील आमदार अशोक चव्हाण यांनी या रूग्णालयाच्या व्यवस्थापनाबद्दल गंभीर तक्रारी केल्या आहेत. या रूग्णालयात कमालीची अस्वच्छता आहे. रूग्णालयात डॉक्टर नाहीत, स्टाफ नाही, औषधांचा तुटवडा आहे असा गंभीर आरोप केला आहे. हि वस्तूस्थिती आहे. केवळ नांदेडच्या शासकीय रूग्णालयातच असा प्रकार घडतोय असे नाही तर लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय महाविद्यालयात देखील डॉक्टर नाहीत, स्टाफ नाही, स्वच्छता नाही, औषधी नाहीत येथील रूग्णालयातील डॉक्टर सरळ–सरळ रूग्णांच्या नातेवाईकांना औषधी व साहित्य बाहेरून आणण्यासाठी चिट्ट्या देतात आणि नातेवाईक मजबुरीने शासकीय रूग्णालयात उपचार घेतात. नांदेडच्या शासकीय रूग्णालयात देखील हेच घडले आहे. याला आरोग्य विभाग जबाबदार आहे. या रूग्णालयात योग्य स्टाफ का भरला नाही? औषधाचा पुरवठा का केला नाही? हे महत्वाचे आहे. सरकार हि असे चालले आहे कि राज्यातील अनेक जिल्ह्याला स्वतंत्र पालकमंत्रीच नाहीत. नियमित पालकमंत्री दिला तर जिल्ह्यात वेळच्यावेळी बैठका होतील. त्या बैठकांमधून संबंधीत विभागप्रमुख आपल्या अडचणी मांडतील, लोकही पालक म्हणून मंत्र्याकडे आपली कैफीयत मांडतील, पण एका–एका मंत्र्याकडे पाच–पाच जिल्ह्याचे पालकतत्व दिल्याने पालकमंत्रीच अशा जिल्ह्याकडे दुर्लक्ष करतात, त्या–त्या जिल्ह्यात लोकप्रतिनिधी असतात पण ते सरकार दरबारी नेमके काय प्रश्न मांडतात, कोणाचे प्रतिनिधीत्व करतात हे कोडेच आहे. नांदेडच्या शासकीय रूग्णालयातील ३१ बळी गेल्यानंतर विरोधकांकडून टिका आणि सरकारकडून सारवासारव केली जात आहे. चौकशी समितीही नेमली आहे. चौकशी समिती काहितरी थातूर–मातूर चौकशी करेल पण '३१' जणांचे 'जीव' परत आणून देणार नाही. याच रूग्णालयात औषधाविना आणखी ७0 रूग्ण अत्यवस्थ आहेत असे सांगितले जात आहे. नांदेडच्या शासकीय रूग्णालयाच्या अधिष्ठाताची या दुर्घटनेनंतर पहिली प्रतिक्रिया 'औषधी नव्हती मी काही करू शकलो नाही' अशी आहे. हा प्रकार भीषण आहे. जरूर या दुर्घटनेस अधिष्ठाता जबाबदार नसेल पण पुरेशे डॉक्टर, स्टॉफ, औषधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे. प्रत्येक शासकीय रूग्णालयात डॉक्टर नाहीत, औषधी नाहीत हि तक्रार १00 नव्हे १000% खरी आहे. हा प्रत्येक रूग्ण व रूग्णांच्या नातेवाईकांचा अनुभव आहे. पाण्यावाचून 'मासे' जसे तडफडून मरावेत तसे औषधाअभावी ३१ जणांचा जीव नांदेड सरकारी रूग्णालयात गेले असतील तर याला शासनच जबाबदार आहे. या ३१ जणांच्या मृत्यूस जबाबदार म्हणून संबंधीतांवर गुन्हे दाखल व्हायलाच हवेत. नांदेडची घटना गंभीर आहे. अशा घटना राज्यात वारंवार घडत आहेत. अशा दुर्घटनेनंतर राजकारणी स्वतःला गंभीर आजार झाल्यासारखा चेहरा करून प्रतिक्रिया देतात, दुर्घटनेची पुनरावृत्ती होतेय आता. न्यायालयाने स्वतः होऊन दखल घेऊन संबंधीतांवर गुन्हे दाखल करण्यास भाग पाडले पाहिजे.

# शिंदे–फडणवीस सरकारकडून २४ चिमुकल्यांची हत्याच


## –प्रकाश आंबेडकर

नांदेड : नांदेडच्या शंकरराव चव्हाण शासकीय–वैद्यकीय महाविद्यालयात २४ तासामध्ये २४ रूग्णांचा मृत्यू झाला. त्यात १२ नवजात बालकांचाही समावेश आहे. या २४ निष्पापांचा मृत्यू म्हणजे शिंदे–फडणवीस सरकारने केलेली हत्याच आहे, असा गंभीर आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

प्रकाश आंबेडकरांनी या संदर्भात एक फेसबुक पोस्ट लिहिली आहे. या फेसबुक पोस्टमध्ये प्रकाश आंबेडकर म्हणाले, एकनाथ शिंदे आणि भाजपच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सरकारने २४ निष्पाप अमूल्य जीवाची हत्या केली. २४ जिवामध्ये १२ नवजात बाळाचा समावेश आहे हे ऐकून मी आणि माझी पत्नी निशब्द झालो आहे,

या प्रत्येक मृत्यूची सखोल चौकशी करण्याची गरज आहे. एका दिवसात एवढे मृत्यू होत असतील तर त्याचे गांभीर्य मुख्यमंत्री आणि यंत्रणेनं लक्षात घेऊन तत्काळ चौकशीचे आदेश देणे अपेक्षित आहे, असे राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. औषधांअभावी १२ बालकांसह २४ जणांचा मृत्यू होणं दुःखद आहे. भाजप सरकार हजारो कोटी रुपये आपल्या प्रचारावर खर्च करत आहे. पण मुलांच्या औषधासाठी पैसे नाहीत, नांदेड घटनेवर शोक व्यक्त करत राहुल गांधींनी भाजपवर टीका केली आहे.

नांदेड येथील शासकीय रुग्णालयात २४ तासात १२ नवजात बालकांसह २४ जणांचा मृत्यू होण्याची दुर्दैवी घटना ही अक्षरशः मन हेलावून टाकणारी आहे. दोनच महिन्यांपूर्वी ठाण्यातील महानगरपालिकेच्या कळवा रुग्णालयात एकाच रात्रीत १८ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना



घडली होती. मात्र या घटनेला गांभीर्याने न घेतल्यानेच नांदेड येथील शासकीय रुग्णालयात अशा प्रकारच्या एका अत्यंत गंभीर घटनेची पुनरावृत्ती झाली. यातून सरकारी यंत्रणांचे अपयश स्पष्ट होते. किमान वेळीच या दुर्दैवी घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन या घटनांची पुनरावृत्ती होणार नाही. आणि निष्पाप रुग्णांचा जीव वाचला जाईल यासाठी ठोस पावले उचलली जावीत याकडे राज्य सरकारने लक्ष देणे आवश्यक आहे, असे शरद पवार म्हणाले.

नांदेडच्या शासकीय रुग्णालयातील घटनेवर आमदार रोहित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. या घटनेची सखोल चौकशी होणं गरजेचं आहे. तर हे मृत्यू निष्काळजीपणामुळे झाले असतील तर त्याची जबाबदारी या विभागाचे मंत्री घेणार का? असा सवाल रोहित पवारांनी उपस्थित केला आहे. तर हाफकिनने औषध खरेदी बंद केल्यामुळेच राज्यभरात सरकारी रुग्णालयात औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याचा आरोप आदित्य ठाकरेंनी केला आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, वेळेवर औषध पुरवठा न झाल्याने रुग्णांना जीव गमवावा लागला. हाफकिनने औषध खरेदी बंद केल्यामुळेच राज्यभरात सरकारी रुग्णालयात औषधांचा तुटवडा भासत आहे. मुंबईत देखील अनेक सरकारी आणि महानगरपालिका रुग्णालयांमधे औषधांची हीच परिस्थिती आहे. त्याचे परिणाम राज्यभरातल्या निष्पाप जनतेला भोगावे लागत आहेत.

## गणेश नाईकांचा पुतण्या असल्याचे भासवून कॉन्ट्रॅक्टरला ६ लाखास फसविले

लातूर : मी माजी खासदार गणेश नाईक यांचा पुतण्या आहे. मी नवी मुंबईचा माजी महापौर आहे. तुम्हाला जिओ कंपनीचे सब कॉन्ट्रॅक्ट देतो म्हणून एका व्यक्तीने लातूरच्या कॉन्ट्रॅक्टरची ६ लाख रूपयांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिनसिंग मदनसिंग परदेशी रा. मुंबई असे नाव असलेल्या व्यक्तीने लातूर येथील अविनाश सर्जेराव मोरे यांच्याशी संपर्क साधला. त्यांना लातूर येथे जिओ कंपनीचे सब कॉन्ट्रॅक्ट देतो, मी गणेश नाईक यांचा पुतण्या आहे. नवी मुंबईचा माजी महापौर आहे, असे म्हणून विश्वासात घेतले. त्यानंतर अविनाश सर्जेराव मोरे याने बँक ऑफ महाराष्ट्र मुख्य शाखा १ नं. चौक एमआयडीसी लातूर येथून संबंधीत भामट्यास ३० सप्टेबर २०२३ रोजी दुपारी आरटीजीएस द्वारे ६ लाख रूपये पाठविले. त्यानंतर संबंधीत भामट्याने जिओचे सब कॉन्ट्रॅक्टही दिले नाही व पैसेही दिले नाही. याबाबत एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## म्हैस व रेड्यास शॉक देऊन मारले

लातूर : मौजे सुमठाणा, ता. शिरूर अनंतपाळ येथील शेत शिवारामध्ये एका व्यक्तीने एका महिलेच्या शेतात बांधलेल्या म्हैस व रेड्यास शॉक देऊन ठार मारल्याप्रकरणी शिरूर अनंतपाळ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राम बापूराव मानकेश्वरे रा. सुमठाणा, ता. शिरूर अनंतपाळ यांनी शकुंतलाबाई रघुनाथ बिरादार रा. सुमठाणा यांच्या शेतात बांधलेली म्हैस व एक रेडा यास ठार मारण्याच्या उद्देशाने राम माणकेश्वरे याने शेतातच असलेल्या मोटारीची तार काढून ती तार म्हैस व रेडा बांधलेल्या कडीला जोडली व विद्युत प्रवाह चालू केला. यात विजेचा शॉक लागून म्हैस व रेडा अक्षरशः तडफडून मरण पावले.

या प्रकरणी शिरूर अनंतपाळ पोलिसांत राम मानकेश्वरे याच्या विरोधात कलम ४२९ भादंवि व ११ (एल) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने जरांगे पाटील यांचा उद्या लातुरात सत्कार

लातूर : मराठा आरक्षणासाठी लढा उभारलेले मनोज जरांगे पाटील हे लातूर जिल्हा दौऱ्यावर येत असून बुधवार ४ ऑक्टोबर रोजी त्यांचे सकाळी ११.३० वाजता लातूर शहरात आगमन होणार आहे.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात त्यांचे लातूर जिल्हा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने भव्य स्वागत होणार असून त्यांच्या कार्याप्रति मोर्चाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली जाणार आहे. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात येणार असून ते उपस्थितांना मार्गदर्शनही करणार आहेत. या पार्श्र्वभूमिवर क्रांती मोर्चाच्या वतीने समाजबांधवांची नुकतीच बैठक घेण्यात आली असून कार्यक्रमाचे व्यापक नियोजनही करण्यात आले आहे.

बुधवारी होणाऱ्या या कार्यक्रमास सकल मराठा समाज बांधव, भगिनी ,विद्यार्थी, विद्यार्थींनी यांनी लातूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान लातूर तालुक्यातील गाधवड येथे याच दिवशी दुपारी दोन वाजता जरांगे पाटील यांची सभा होणार आहे या सभेसही समाजबांधवानी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे अशीही विनंती लातूर जिल्हा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आली आहे.

## नांदेड व संभाजीनगर रुग्णालयातील मृत्यू सरकारी हत्या; ३०२ चे गुन्हे दाखल करा : नाना पटोले

मुंबई : ठाण्यातील कळव्याच्या सरकारी रुग्णालयात झालेल्या मृत्यू प्रकरणातून राज्य सरकारने काहीही बोध घेतलेला दिसत नाही. ठाण्यानंतर नांदेड येथील रुग्णालयामध्ये ४८ तासांत ३१ रुग्णांचा मृत्यू व छत्रपती संभाजीनगर मधील घाटी रुग्णालयामध्ये २४ तासांत दोन नवजात बालकांसह १० जणांचा मृत्यू, या संताप आणणाऱ्या घटना आहेत. राज्यातील शिंदे–फडणवीस–पवार सरकार लाजलज्जा सोडून दिलेले गेंड्याचे कातडीचे सरकार आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. औषधे नसल्याने हे मृत्यू झाल्याचे समोर येत आहे हे अत्यंत चीड आणणारे आहे. सरकारकडे स्वतःचे गुणगान गाणारे इव्हेंट करण्यासाठी, जाहीरातबाजी करण्यासाठी आणि आमदार खरेदीसाठी पैसे आहेत आणि सर्वसामान्य जनतेच्या औषधे खरेदीसाठी पैसे नाहीत का? असा संतप्त सवाल करत हे सरकारी अनास्थेचे बळी असून ३०२ चे गुन्हे दाखल करा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

यासंदर्भात भाजपाप्रणित राज्य सरकारवर तोफ डागत नाना पटोले पुढे म्हणाले की, राज्यातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणेला भ्रष्टाचाराचा भस्म्या रोग झाला असून संपूर्ण यंत्रणाच व्हेंटिलेटरवर आहे. सरकारी रुग्णालयात पुरेसे डॉक्टर व कर्मचारी नाहीत, औषधांचा तुटवडा आहे. रुग्णालयातील यंत्रसामुग्री नादुरुस्त असल्याने धुळ खात पडलेली आहे. मोठ्या शहरामध्ये आरोग्य सेवांची ही अवस्था आहे तर ग्रामीण रुग्णालयातील अवस्था काय असेल याची कल्पना न केलेली बरी. शासकीय रुग्णालये मृत्यूचे सापळे झाले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाने ४० टक्क्यांची मलई खाण्यासाठी वेळेत औषधी खरेदी केली नाही. त्यामुळे २०२२ मध्ये तरतूद केलेला ६०० कोटींचा निधी परत गेला. भाजपा सरकारने १५ ऑगस्टपासून राज्यात मोफत आरोग्य सेवा सुरु केल्याचा मोठा गाजावाजा केला पण रुग्णालयात सरकार सेवा देत नसून मृत्यू देत आहे. भाजपा सरकारच्या काळात मरण स्वस्त झाले आहे हेच यावरून दिसत आहे.

मुख्यमंत्र्यांचे शहर असलेल्या ठाणे शासकीय रुग्णालयात ऑगस्ट महिन्यात एकाच रात्री १८ मृत्यू झाले, त्यावर चौकशी समिती नेमली गेली, त्या समितीचे काय झाले? एकाद्या डॉक्टर वा वैद्यकीय कर्मचाऱ्याला निलंबित करुन हे प्रकार थांबणार नाहीत. संबंधित मंत्री आणि मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. सर्वसामान्य जनतेचे मृत्यू होत असताना संबंधित खात्याचे मंत्री काय करतात? मुख्यमंत्र्यांमध्ये थोडीशी संवेदना शिल्लक असेल तर त्यांनी तात्काळ वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांची हकालपट्टी करावी असेही पटोले म्हणाले.

### त्यांच्या मते....

▣ **भाजपा अनेक पक्षासोबत आघाडी करीत असला तरी आघाडीची सुत्रे आपल्याकडेच राहणार आहेत.**

–ना. देवेंद्र फडणवीस

- - - - - - - - - - -

☛ ते दिसतेच आहे

▣ **भाजपा केवळ सत्तेसाठी घरं आणि पक्षं फोडण्याचे काम करित आहे.**

– खा. सुप्रिया सुळे

- - - - - - - - - - -

☛ अशा घरातील बहुतांश सदस्य अति महत्वकांक्षी बनले आहेत. त्याचाच फायदा घेतला जात असावा.

▣ **नारीशक्ती वंदन विधेयक पारित झाले असले तरी ते किमान २०३८ पर्यंत तरी लागू होणे शक्य नाही.**

– योगेंद्र यादव

- - - - - - - - - - -

☛ निवडणुकीसाठी जूमलाच म्हणायचा.

▣ **नांदेडच्या शासकीय रूग्णालयातील रूग्ण मृत्यूचा एक–एकाचा हिशोब देणार.**

– मंत्री ना. हसन मुश्रीफ

- - - - - - - - - - -

☛ औषधी दिली असती तर, हे मृत्यू टळले असते.

## मान्सूनचा परतीचा प्रवास २–३ दिवसात सुरु, हवामान विभागाची माहिती

मुंबई : राज्यातून नैऋत्य मान्सून आठवड्याच्या शेवटी माघारी फिरण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. पुढील दोन ते तीन दिवसात मान्सून महाराष्ट्रातून एक्झिट घेण्याची शक्यता आहे.भारतीय हवामान विभागानं महत्त्वाची माहिती दिली आहे. धुळे, नंदुरबार, नाशिक, जळगाव भागातून मान्सून माघारी फिरण्यास पुढील दोन ते तीन दिवसात अनुकूल वातावरण आहे.

राज्याच्या बहुतांश भागात सध्या पावसानं दडी मारली आहे. काही भागत हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडत आहे. दरम्यान, सध्या राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना पावसाची खूप गरज आहे. पाण्याअभावी शेतकऱ्यांची पिकं वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार गुजरातच्या काही भागातून मान्सून माघारी फिरला आहे. येत्या दोन ते तीन दिवसात महाराष्ट्रातील काही भागातून मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरू होणार आहे.

राज्यात काही ठिकाणी पावसाने दडी मारल्याने परिस्थिती अधिकच गंभीर होत चालली आहे. राज्यातील नऊ जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट कायम आहे. ५ ऑक्टोबरच्या आसपास मान्सून महाराष्ट्राच्या उत्तर भागातून परत जातो. उर्वरित राज्यातून जाण्यासाठी पाच ते दहा दिवस लागतात. १० ऑक्टोबरपर्यंत मान्सून राज्यातील बऱ्याच परत गेलेला असतो. १९७५ ते २०२२ या कालावधीत आतापर्यंत मान्सून परतीच्या तारखांवर नजर मारल्यास लक्षात येते की, २००५ साली २ सप्टेंबरला मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाला होता. त्यानतंर २००७ साली ३० सप्टेंबरला परतीचा प्रवास सुरू झाला होता. म्हणजे मान्सूनच्या आगमनाच्या तारखांपेक्षा मान्सूनच्या परतीच्या तारखांमध्ये विविधता दिसून येते.

जून ते सप्टेंबर या कालावधीत जेव्हा भारतात मान्सून सक्रिय असतो तेव्हा आपल्याला दोन प्रकारच्या वाऱ्यांमध्ये युद्ध पाहायला मिळते. पाकिस्तान, अफगाणिस्तान, इराणमध्ये कोरडी हवा असते. तर याउलट बंगालचा उपसागर, अरबी समुद्र किनारपट्टी भागातील हवेत आद्रता असते. भारतावर या दोन वाऱ्यांमध्ये युद्ध सुरू असते त्यामध्ये कोणते वारे हे अधिक शक्तिशाली आणि प्रभावी आहे त्यावर मान्सून कसा असणार हे निश्चित होते.



## ५ हजार ई पुस्तकाची लायब्ररी महाविद्यालयास भेट

लातूर : महात्मा गांधी उच्च माध्यमिक विद्यालय सुळ गल्ली लातूरचा माजी विद्यार्थी दीपक सलगर यांनी तयार केलेली ५००० ई पुस्तकाची डिजिटल लायब्ररी विद्यार्थी व शिक्षकांसाठी गांधी जयंती निमित्त महाविद्यालयास मोफत दिली.

या लायब्ररीमध्ये स्पर्धा परीक्षा, एमपीएससी, यूपीएससी तसेच कविता, मराठी, कादंबऱ्या, कथा, इतिहास, भावबंध, धार्मिक, विनोदी, कानगोष्टी, नाटक, प्रवास–वर्णन, संगीत, चरित्र, माहिती, बालगाणी, महाराष्ट्र व देशातील दैनिक सर्व भाषेतील वर्तमानपत्र अशा असंख्य बाबी विनामूल्य देण्यात आले आहेत. या गुरुदक्षिणेबद्दल प्राचार्य नागनाथ सुळ, सांस्कृतीक विभाग प्रमुख प्रा. तानाजी भोसले यांनी दीपक सलगर यांचे आभार मानले.

या प्रसंगी प्रा. दिलीप केंद्रे, प्रा. प्रल्हाद गुरमे, मुख्याध्यापक रमेश राठोड, गणपत सोलंकर, पांडुरंग मदने, अनंत गाजरे, दत्तात्रय धूळशेटे, गोविंद चामे, प्रकाश काचपुरे व विद्यार्थी उपस्थित होते.




# कारच्या डॅशबोर्डवर असतात ५ धोक्याचे संकेत, लक्ष न दिल्यास होऊ शकतो जीवाला धोका

तुम्ही अनेकदा कारमधून प्रवास केला असेल आणि डॅशबोर्डवर येणारे अलर्टही तुम्ही पाहिले असतील. पण डॅशबोर्डवर येणाऱ्या सर्व अलर्टबद्दल तुम्हाला माहिती आहे का? तुमच्यापैकी बहुतेकांना हे सर्व अलर्ट माहित नसतात आणि तुमचा थोडासा निष्काळजीपणा मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरतो. पण तुमच्यासोबत असे होऊ नये म्हणून आम्ही तुम्हाला कारच्या डॅशबोर्डवर येणाऱ्या ५ अलर्टबद्दल सांगणार आहोत. हे तुम्हाला तुमच्या प्रवासादरम्यान कोणताही त्रास टाळण्यासाठी अलर्ट करेल.

**कार डॅशबोर्डवर असतात ५ वार्निंग साईन**

ऑइल प्रेशर वार्निंग लाईट : तुम्हाला वेळोवेळी ऑइल प्रेशर अपडेट्स देते, ज्यामुळे तुम्ही कारच्या ऑइल प्रेशरवर लक्ष ठेवू शकता. जेव्हा ते कमी दाब दाखवते, तेव्हा तुम्ही गाडी थांबण्यापूर्वी शक्य तितक्या लवकर पेट्रोल पंपावर जाऊ शकता.

टायर प्रेशर वार्निंग लाईट : ढझचड चिन्ह घन असल्यास, तुमच्या एक किंवा अधिक टायरमधील दाब खूप कमी किंवा खूप जास्त आहे.

इंजिन टेम्परेचर वार्निंग लाईट : जर तुम्हाला या चिन्हाचा पॉप-अप दिसला, तर याचा अर्थ तुमचे इंजिन जास्त गरम होत आहे.

ट्रॅक्शन कंट्रोल लाइट: एक चाक दुसऱ्यापेक्षा वेगाने फिरत आहे की नाही हे शोधण्यासाठी ट्रॅक्शन कंट्रोल सिस्टम तुमची अँटी-लॉक ब्रेक सिस्टम (-इड) वापरते.

अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम (-इड) वार्निंग : जेव्हा तुम्ही अचानक ब्रेक लावता, जसे की तुम्ही गुळगुळीत रस्त्यावर ब्रेक लावता, तेव्हा तुमची चाके लॉक होण्यापासून रोखण्यासाठी -इड ब्रेक वाचवते.

याशिवाय डॅशबोर्डवर तुम्हाला इतर अनेक अलर्ट्स पाहायला मिळतात, जर तुम्ही या अलर्टकडे दुर्लक्ष केले, तर तुम्हाला खूप महागात पडू शकते. तुमच्या सुरक्षेसाठी ॲलर्ट तयार केले जातात, त्याद्वारे तुम्हाला कोणताही त्रास होण्यापूर्वी अलर्ट मिळतो, त्यामुळे तुम्ही अलर्ट होतात.




# घरबसल्या करायची असेल बंपर कमाई, तर करा जपानी रेड डायमंड पेरूची शेती

पेरू खायला सगळ्यांनाच आवडते. त्याची लागवड जवळपास संपूर्ण भारतात केली जाते. त्याचा दरही संपूर्ण देशात जवळपास सारखाच आहे. पेरूमध्ये अनेक जीवनसत्त्वे आढळतात. पण त्यात सर्वात जास्त प्रमाणात व्हिटॅमिन सी असते. याशिवाय पेरूमध्ये लोह, चुना आणि फॉस्फरस मुबलक प्रमाणात असतात. जर तुम्ही नियमितपणे पेरूचे सेवन केले, तर तुमचे शरीर निरोगी आणि ताजे राहते. त्यामुळे भारतात पेरूच्या अनेक जातींची लागवड केली जाते. पण आज आपण अशा एका जातीबद्दल सांगणार आहोत ज्यांच्या लागवडीमुळे शेतकरी श्रीमंत होऊ शकतो.

भारतात साधारणपणे पेरू ४० ते ६० रुपये किलोने विकला जातो. पण जपानी रेड डायमंड हा पेरूचा एक प्रकार आहे ज्याचा दर खूप जास्त आहे. हा त्याच्या चव आणि गोडपणासाठी ओळखले जाते. बाजारात १०० ते १५० रुपये किलोने विकला जातो. त्याची लागवड करणारे शेतकरी काही वर्षांत श्रीमंत झाले आहेत. विशेष म्हणजे अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांनी जपानी रेड डायमंड पेरूची लागवडही सुरू केली आहे.

त्याच्या लागवडीसाठी १० अंश सेल्सिअस ते ४२ अंश सेल्सिअस तापमान चांगले मानले जाते. त्याच्या लागवडीसाठी, मातीचे पीएच मूल्य ७ ते ८ दरम्यान असावे. काळ्या आणि वालुकामय चिकणमातीमध्ये जपानी रेड डायमंड पेरूची लागवड केल्यास बंपर उत्पादन मिळेल. विशेष म्हणजे शेतात जपानी डायमंड पेरताना ओळीतील अंतर ८ फूट असावे. त्याच वेळी झाडांमधील अंतर ६ फूट ठेवावे. त्यामुळे झाडांची वाढ झपाट्याने होते. याशिवाय झाडांची छाटणीही वर्षातून दोनदा करावी.

इतर पिकांप्रमाणे, जपानी रेड डायमंड पेरूच्या शेतात शेण आणि शेणखत खत म्हणून वापरा. त्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही एनपीके सल्फर, कॅल्शियम नायट्रेट, मॅग्नेशियम सल्फेट आणि बोरॉन खत म्हणून वापरू शकता. त्याच वेळी, झाडांना पाणी देण्यासाठी फक्त ठिबक सिंचन वापरा. त्यामुळे पाण्याचा अपव्यय होत नाही. देशी पेरूच्या लागवडीतून तुम्ही वर्षाला एक लाख रुपये कमावत असाल, तर जपानी रेड डायमंड पेरूच्या लागवडीतून तुमचे उत्पन्न तिप्पट वाढेल. म्हणजेच तुम्हाला एका वर्षात ३ लाख रुपये मिळतील.

# एफ. आय.आर. दाखल करण्याचा अधिकार फक्त स्थानिक पोलिसांना

नागरिकांनी केलेल्या कोणत्याही प्रकरणाची एफ.आय.आर. नोंदणी करण्याचा अधिकार फक्त स्थानिक पोलिसांना आहे. पोलिस विभागांतर्गत अनेक पोलिस पथके कार्यरत आहेत, जी वेगवेगळ्या प्रकरणांचा तपास करतात आणि वेगवेगळ्या गुन्हेगारी कारवायांवर छापे टाकतात, ज्यात गुन्हे शाखा, सामाजिक सुरक्षा विभाग, दरोडा प्रतिबंध कक्ष, महिला सुरक्षा विभाग, एटीएस यांचा समावेश आहे. यामध्ये सायबर क्राईम सेल, महिला अत्याचार विरोधी पथक, राज्य गुप्तवार्ता, म्हणजे राज्य गुप्तचर (IB), गुन्हे अन्वेषण ब्युरो (CID) इत्यादींचा समावेश आहे. या प्रकाराची माहिती क्रिमिनल लॉयर ॲड. राशिद सिद्दीकी यांनी माझा पेपरच्या प्रतिनिधीला चर्चेदरम्यान दिली.

ते म्हणाले की, कोणत्याही गंभीर प्रकरणाबाबत नागरिकांच्या तक्रारीच्या आधारे एफआयआर दाखल केला जातो. ती दाखल करण्याचा अधिकार स्थानिक पोलिसांमध्ये नियुक्त केलेल्या पोलिस कर्मचारी किंवा अधिकाऱ्याला आहे, म्हणजे पोलिस स्टेशन आणि शहर पोलिस आयुक्त किंवा एस.पी. पोलिस अधीक्षक ऋख अंतर्गत कार्यरत विविध विभागांचे पोलिस. त्याची नोंद झाल्यानंतर या प्रकरणाचा तपास होऊ शकतो. उदाहरणार्थ, पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुठेतरी दरोडा पडला, तर त्याची एफआयआर नोंदवली जाते. त्याच पोलीस ठाण्यात असेल, मात्र गुन्हे शाखेचा दरोडा बंदी कक्ष या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस अधिकारी करतील. अनेक वेगवेगळ्या क्राईम सेल आहेत, ते शहर पोलीस आयुक्त आणि उपायुक्तांच्या अंतर्गत काम करतात.

तर स्थानिक पोलीस ठाण्यात असे होत नाही. वरिष्ठ पोलीस निरीक्षक हा स्थानिक पोलीस ठाण्याचा प्रभारी असतो, पोलीस अधिकारी व कर्मचारी त्यांच्या अखत्यारीतील सर्व पदांवर काम करतात. कोणते पोलीस दल कोणत्या गुन्ह्यांवर काम करते ते जाणून घेऊ या. सर्व प्रथम शहर पोलीस आयुक्तांनी स्थापन केलेल्या गुन्हे शाखेबद्दल बोलूया. देशाची राजधानी दिल्लीत १९९१ मध्ये क्राइम ब्रँच सेलची स्थापना करण्यात आली. त्यानंतर वेगवेगळ्या राज्यात प्रत्येक शहरात गुन्हे शाखेचे सेल तयार करण्यात आले. हा सेल बनवण्यामागे पोलिसांचा एक हेतू होता. तो असा की एखाद्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत एफआयआर नोंदवला गेला असेल, पण आरोपी दुसऱ्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत लपला असेल, तर पोलिसांना हे कळते.

परिस्थितीनुसार, कायद्यानुसार आधी त्या अधिकारक्षेत्रातील पोलीस ठाण्याला माहिती द्यावी लागते. अनेकवेळा असे घडले की, पोलिसांनी दुसऱ्या पोलिस ठाण्यात माहिती देईपर्यंत आरोपी पळून जाण्यात यशस्वी होतो. ही बाब लक्षात घेऊन शहरातील सर्व पोलीस आयुक्तांनी गुन्हे शाखेची स्थापना केली असून, शहरातील कोणत्याही पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे शाखेचे पोलीस आरोपींना अटक करू शकतात.

ही माहिती थेट पोलिस आयुक्तांना देता येईल. त्या जागेची पोलीस ठाण्याला माहिती देण्याची गरज नाही. आता क्राइम ब्रँच, महिला सुरक्षा विभाग आणि सामाजिक सुरक्षा विभागाच्या सेलबद्दल बोलूया, तर हे पोलीस दल, कुठेतरी देह विक्री किंवा वेश्याव्यवसाय सुरू असेल आणि या सेलला त्याचा सुगावा लागला, तर ही टीम ग्राहक म्हणून तिथे जाते. या प्रकरणाची सखोल चौकशी करून, मग संपूर्ण टीम येते आणि तिथे छापा टाकतात आणि हे सर्व घडत असलेल्या परिसराच्या स्थानिक पोलीस ठाण्यात जाऊन एफआयआर




दाखल करतात. अहवालाचा पंचनामा या कक्षाकडूनच केला जातो. आरोपींना अटक केल्यानंतर वेश्या व्यवसायात गुंतलेल्या महिलांना सामाजिक संस्थेत पाठवले जाते आणि या प्रकरणाचा तपास करून दोषारोपपत्र त्या पोलिस ठाण्यात दिले जाते. चर्चेदरम्यान ॲड सिद्दीकी पुढे म्हणाले की, जर आपण क्राइम ब्रँच सायबर पोलिसांबद्दल बोललो, तर सायबर सेल ऑनलाइन फसवणूक, सायबर फ्रॉड, पुरुष किंवा महिलेचा अश्लील व्हिडिओ व्हायरल करणे इत्यादी बाबींवर काम करते. सायबर सेल पोलिसांनी घटना घडलेल्या परिसराच्या स्थानिक पोलीस ठाण्यात एफआयआर देखील दाखल करु शकते.

एफआयआर दाखल झाल्यानंतर प्रकरणाचा तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले जाते. एटीएस पोलिस दलाबद्दल बोलायचे झाले, तर त्याला दहशतवादविरोधी पथक म्हणतात. हे पोलीस दल बॉम्बस्फोट दहशतवादी हल्ल्यांचा तपास करते. या प्रकरणांचा एफआयआर स्थानिक पोलीस ठाण्यातही दाखल केला जातो. ही घटना जिथे घडली, तिथे आरोपींना अटक करून प्रकरणाचा तपास करण्याची जबाबदारी एटीएसची आहे. राज्य गुप्तचर यंत्रणा या दलाचा शहर पोलिसांशी कोणताही संबंध नाही. या दलाला स्टेट आयबी असेही म्हणतात. या दलाचे आयजीएसपी. सर्व काही वेगळे आहे. हे दल कोणत्याही दहशतवादी हल्ल्याच्या शक्यतेवर काम करते. हे देशातील अवैध घुसखोरी आणि परदेशातून येणाऱ्या फोन कॉल्सवरही काम करते.

आयबीलाही एफआयआर नोंदवण्याचा अधिकार नाही. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) बद्दल माहिती देताना ॲड. सिद्दीकी यांनी सांगितले की, सार्वजनिक सेवक, पोलिस अधिकारी, पोलिस कर्मचारी किंवा कोणत्याही विभागातील सरकारी कर्मचारी तुमच्याकडून लाच मागितल्यास हे पोलिस दल कारवाई करते. या विभागातील सर्वात मनोरंजक गोष्ट म्हणजे या विभागात अशा लोकांना घेतले जाते, ज्यांच्या विरोधात एकही तक्रार नाही. तो पूर्ण प्रामाणिकपणे काम करतो आणि दुसरी गोष्ट म्हणजे या विभागात त्यांची नियुक्ती झाल्यावर त्या अधिकाऱ्याचे एक पद वाढवले जाते.

उदाहरणार्थ, जर एखादा अधिकारी पोलीस ठाण्यात डख म्हणजेच उपनिरीक्षक म्हणून काम करत असेल आणि त्याला लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरोमध्ये नेले असेल, तर त्याला थेट झख म्हणजेच निरीक्षक बनवले जाते. त्याचा पगारही पीआयएवढा असतो. त्याचप्रमाणे एका पीआयची एसीबीमध्ये बदली होऊ शकते. विभागात असेल तर त्याला एसीपी म्हणतात किंवा D.Y.S.P. बनवले जाते. जोपर्यंत ते या विभागात कार्यरत राहतील तोपर्यंतच ही बढती टिकेल. लाचलुचपत प्रतिबंधक विभागालाही एफआयआर दाखल करण्याचा अधिकार नाही. या दलाच्या स्थानिक पोलीस ठाण्यात जाऊन एफआयआर दाखल करावी लागते.

# पिकांची साठवणूक

शेतीमधून विविध हंगामांमध्ये जवळजवळ वर्षभर पिके उत्पादित होत असतात. अनेक पिके उत्पादित झाल्यावर ताबडतोब बाजारपेठेत आणली जातात तसेच काही पिकांचे उत्पादन आणि पिके बाजारपेठेत आणणे यात ठराविक अंतर ठेवणे आर्थिक फायद्यासाठी आवश्यक ठरते त्यामुळे पिकांची साठवणूक महत्त्वाची ठरते परंतु उच्च प्रतीच्या आणि पुरेशा साठवणुकीच्या सोयींची कमतरता शेती क्षेत्रात दिसून येते. यामुळे शेतकर्यांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक हानी होते.

वर्षभरातील शेती उत्पादनांचा विचार करता साधारणपणे भाजीपाला, फळे, फुले, कंदवर्गीय फळे, फळभाज्या यासह इतर अनेक पिकांचे उत्पादन होते. त्या त्या हंगामात त्या त्या पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. पंधरा दिवस ते महिनाभराच्या अंतराने बाजारात जवळ जवळ सर्वच शेतकर्यांकडून एकाच प्रकारची पिके विक्रीसाठी आणली जातात. त्यामुळे अर्थशास्त्रातील नियमानुसार वस्तूंचा पुरवठा वाढला की वस्तूंच्या किमती कमी होतात. त्यामुळे शेतकर्यांचे नुकसान होते वस्तूचे उत्पादन जरी साधारणपणे एकाच कालावधीत होत असले तरी बाजारातील किमतीचा अंदाज घेऊन उत्पादित माल शेतकर्यांनी बाजारात आणायला हवा. त्यासाठी उत्पादित मालाची साठवणूक महत्त्वाची ठरते.

नाशवंत म्हणजे जास्त कालावधीपर्यंत न टिकणार्या पिकांसाठी साठवणूक महत्त्वाची ठरते. उदा. भाजीपाला, फळे, द्राक्ष, टोमॅटो यासारखी पिके ठराविक कालावधीनंतर खराब होतात, तर कांदा, कंदवर्गीय भाज्या, टरबूज, खरबूज यांचे टिकण्याचे प्रमाण त्यामानाने जास्त दिसून येते. कठीण आवरण असणारी पिके उदा. कवट यांचे टिकण्याचे प्रमाण त्यापेक्षा अधिक दिसून येते. अशा पिकांच्या बाबतीत थोड्या कालावधीनंतर वस्तू बाजारपेठेत विक्रीसाठी पाठवली तरी चालते.

या सर्व प्रकारांमध्ये विशेष अशी काळजी घ्यावी लागते ती नाशवंत पिकांची उदा. भाजीपाला, फळे, टोमॅटो, द्राक्ष, स्ट्रॉबेरी यासारख्या पिकांचा वापर किंवा उपभोग लवकर घेणे आवश्यक असते.

विविध फळे, भाज्या, द्राक्ष यांच्यासाठी साठवणूक किंवा शीतगृहांची मोठी अडचण दिसून येते. तसेच कांदा पिकासाठी कांदा चाळीशी उपलब्धता फारच कमी शेतकर्यांकडे दिसून येते. त्यामुळे साठवणुकीच्या सोयी अभावी वस्तूंचा दर्जा कमी होण्यापेक्षा ती वस्तू मिळेल त्या किमतीला बाजारपेठेत विक्री करण्याकडे शेतकर्यांचा कल दिसून येतो. शीतगृहातील साठवणुकीची व्यवस्था तयार करणे ही अत्यंत खर्चिक बाब समजली जाते. त्यामुळे शेतकर्यांना स्वतःची शीतगृहाची व्यवस्था करणे अवघड होते. अशावेळी काही शेतकरी भाडे तत्त्वावर साठवणुकीच्या सोयींचा फायदा घेतात. अशा परिस्थितीत शीतगृहातील साठवणुकीचा खर्च जास्त येतो.

तसेच अनेकदा वस्तूची खात्री देता येत नाही. मालात बदल होण्याची भीती शेतकर्यांना वाटते, तसेच वस्तू साठवणूक करून पुन्हा बाजारात आणताना त्यातील दर्जात थोडाफार फरक पडण्याची भीती शेतकर्यांना वाटते, वस्तूच्या साठवणुकीवर केलेला खर्च वस्तूची पुढे ढकललेली विक्री या सर्वांचा फायदा वस्तूच्या विक्री किमतीत दिसून येईलच याची खात्री शेतकर्यांना देता येत नाही त्यामुळे इच्छा असूनही अनेक शेतकरी अशा प्रकारे शीतगृहातील साठवणूक करत नाहीत. यात बदल होऊन शीतगृहांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला तर शेतकर्यांना मोठा आर्थिक फायदा होण्यास मदत होईल. म्हणजेच बाजारपेठेतील किमतीचा अंदाज घेऊन वस्तू विक्री होऊ शकते. तसेच शेतकर्यांना त्वरित पैशाची निकड निर्माण झाली तर शेतकरी वस्तूची विक्री ताबडतोब करण्यास प्राधान्य देतो.

कांदा पिकासारख्या उत्पादनाच्या साठवणुकीसाठी कांदा चाळीची आवश्यकता असते. कांदा चाळीची निर्मिती देखील तिच्या प्रकारानुसार कमी, मध्यम, आणि जास्त खर्चिक बाब आहे. कांदा साठवणूक करताना शेतकरी उन्हाळी कांद्याच्या बाबतीत पंधरा दिवसापासून तर काही महिन्यांपर्यंत कांदा साठवणूक करताना दिसतात. तसेच साठवणुकीचा कालावधी जसा वाढत जातो तस तसा काही माल वाया जाण्याची भीती असते. कांदा सडणे, कुजणे, त्याची दुर्गंधी



येणे. माल हलका होणे यासारखे प्रकार हे केवळ कांदा चाळीचा दर्जा चांगला नसल्यामुळे होतात. चाळीत स्वच्छ व खेळती हवा चांगल्या प्रमाणावर आवश्यक असते.

कांदा चाळीच्या निर्मितीतही आवश्यक ठराविक शेतकरी वगळता इतर शेतकरी कांदा चाळीच्या निर्मितीत आग्रही दिसत नाहीत, कारण चाळीच्या निर्मितीतही शेतकर्यांना चांगली गुंतवणूक करावी लागते तसेच सर्व उपायांचा वापर करून कांदा चाळ उभारली तरी तिचा वापर वर्षभर कांदा साठवणुकीसाठी करता येत नाही. उन्हाळी कांदा साठवणूक संपल्यानंतर कांदा चाळीचा वापर इतर पिकांसाठी होत नाही.

त्यात शेतकर्यांकडून बिन कामाच्या वस्तू पडीत स्वरूपात ठेवल्या जातात त्यामुळे त्या चाळीवर केलेला खर्च, त्याखाली असलेली जागा एक प्रकारे वापरा बाहेर जाते. गुंतवणूक केलेल्या पैशांचा फायदा ठराविक हंगामा पुरता होत असल्यामुळे शेतकरी कांदा साठवणुकीच्या बाबतीत ठराविक मर्यादे पलीकडे आग्रही दिसत नाहीत. कांदा चाळीसाठी शासनाकडून अनुदान दिले जाते या अनुदानाची प्राप्ती शेतकर्याला टप्प्या टप्प्याने होते.

त्यात अनुदानासाठी तयार करावा लागणारा प्रस्ताव, कांदा चाळीचा आराखडा, प्रस्तावास मिळवावी लागणारी मंजुरी, त्यातील अनेक उणीवा, कांदा चाळीचा प्रस्ताव सादर करणे आणि प्रत्यक्षात कांदा चाळीची निर्मिती, त्यातही बराच कालावधी निघून जातो, तसेच अनेक शेतकरी देखील कांदा चाळ अनुदानाचे हप्ते प्राप्त करण्यास उत्सुक दिसत नाहीत. शासन दरबारी कांदा चाळ अनुदान योजनेतील हप्ते बरेच दिवस पडून राहतात. काही शेतकर्यांच्या उदासीनतेमुळे ही रक्कम बरेचदा परत जाण्याची भीती असते. यावेळी टाळल्यास विविध पिकांची साठवणूक शेतकरी चांगल्या पद्धतीने करू शकतील असा विश्र्वास वाटतो.

**-प्रा.डॉ. कृष्णा शंकर शहाणे**
**(लेखक अर्थतज्ञ आहेत)**

# आरबीआयचे नवे 'यूपीआय लाईट एक्स' फिचर

यूपीआयवरून आपण पैसे ट्रान्सफर करू शकतो, परंतु नेटवर्क नसताना पैसे पाठवण्यात अडचणी येतात यावर यूपीआय लाईटच्या वापराने आता तोडगा निघाला आहे. भारतीय रिझर्व्ह बँक म्हणजेच आरबीआयने एक नवीन यूपीआय लाईट एक्स फिचर लाँच केले आहे. या फिचर्समुळे युजर्सना ऑफलाईन मनी ट्रान्सफरची सुविधा मिळते . तर काय आहे हे यूपीआय लाईट त्यावर हा उहापोह...

अनेकदा नेटवर्क कनेक्टिव्हिटी नसल्यास ऑनलाईन पेमेंट करणे अशक्य असते आणि जर अशावेळी जवळ कॅश नसेल तर खरेदी करता येत नाही. नेमकी हीच अडचण ओळखून यूपीआय लाईट एक्स लाँच करण्यात आले आहे. ज्यामुळे कनेक्टिव्हिटी नसतानाही पैशांची देवाण-घेवाण करता येते. अनेक गावात किंवा दूरच्या ज्या ठिकाणी नेटवर्कची समस्या आहे अशा ठिकाणांसाठी हे खूप फायदेशीर ठरु शकता. अनेकदा फोनमध्ये रिचार्ज नसल्यासही पेमेंट होण्यास प्रोब्लेम येतो.

यूपीआय लाईट एक्स नियर फील्ड कम्युनिकेशन (एनएफसी) सपोर्टने काम करतं. युपीआय लाइटचा उद्देश वापरकर्त्यांना बँकांच्या अधूनमधून येणार्या समस्यांचा सामना न करता अखंडपणे लहान किंमतीचे व्यवहार करण्यास सक्षम करणे हा आहे. नियमित युपीआय व्यवहारांप्रमाणे, याची दैनिक मर्यादा १ लाख रुपये आहे. युपीआय लाइट व्यवहारांची मर्यादा प्रतिव्यवहार ५०० रुपये आहे. यूपीआय लाईट पेमेंट इतर प्लॅटफॉर्मच्या तुलनेत जास्त फास्ट आहे.

**नवीन काय?**

वापरकर्त्यांसाठी डिजिटल पेमेंट अनुभव वाढवण्यासाठी नवीन टेक्नॉलॉजीचा उपयोग करण्याच्या उद्देशाने युपीआयवर कॉन्व्हर्स्टेशनल पेमेंट सक्षम करण्याचा प्रस्ताव आहे, जे वापरकर्त्यांना पेमेंट करण्यासाठी एआय सक्षम प्रणालींसह संभाषणात गुंतवून ठेवण्यास सक्षम करेल. युपीआय लाइट व डिव्हाइस वॉलेटच्या माध्यमातून निअर फिल्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी वापरून युपीआय वर ऑफलाइन पेमेंट सुरु करणे आणि ऑफलाइन मोडमध्ये लहान डिजिटल पेमेंटसाठी व्यवहार मर्यादा २०० रुपयांवरून ५०० रुपये प्रति व्यवहार करणे जाईल.




यातील एक वैशिष्ट्य म्हणजे युपीआय लिटद्वारे नियर-फील्ड कम्युनिकेशन (एनएफसी) तंत्रज्ञानाचा वापर करून ऑफलाइन पेमेंट करणे. हे वैशिष्ट्य लोकांना मर्यादित किंवा इंटरनेट कनेक्टिव्हिटी नसलेल्या परिस्थितीतही डिजिटल पेमेंट करण्यास सक्षम करेल.

**कसे वापरावे?**

यूपीआय लाईट हे 'वन डिव्हाईस व्हॅलेट' आहे ज्यामुळे यूपीआय पीनशिवाय छोटे आर्थिक व्यवहार करता येतील.युपीआय लाईट वापरण्यासाठी, फोन पे, गुगल पे आणि पेटीएम या कोणत्याही पेमेंट ॲपवर जावे लागेल.या ॲपमध्ये प्रवेश केल्यानंतर, सेटिंग्जमध्ये जाऊन युपीआय लाइट चा पर्याय शोधून तुमची बँक निवडून आणि खाते सक्रिय करावे लागेल . ते सक्रिय झाल्यावर, पुढच्या वेळी पेमेंट करताना युपीआय लाइट चा पर्याय निवडून आणि तुमच्या ॲपमधील व्हॅलेटमध्ये काही पैसे टाकावे लागतील. त्यानंतर या व्हॅलेटमधील पेसै तुम्ही यूपीआय लाईटच्या माध्यमातून वापरू शकता. .

लक्षात ठेवा, सध्यातरी कॅनरा बँका, एचडीएफसी बँक, इंडियन बँक, कोटक महिंद्रा बँक, पंजाब नॅशनल बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, यूनियन बँक ऑफ इंडिया, उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक या बँकांचे ग्राहक भीम ॲपच्या माध्यमातून यूपीआय लाईटची सुविधा वापर करू शकतात. तुमचे बँक खाते या निवडक बँकांमध्ये असेल तरच तुम्ही या सुविधेचा लाभ घेऊ शकता.

**यूपीआय आणि यूपीआय लाईट यात कोणता फरक ?**

यूपीआय किंवा यूपीआय लाईट वापरून व्यवहार सुलभ करते. युजर्सचा यूपीआय आयडी किंवा लिंक केलेला फोन नंबर वापरून कोड स्कॅन करून हे व्यवहार पूर्ण केले जाऊ शकतात, मात्र यूपीआय लाईट एक्स वरुन पेमेंट करत असताना दोघांकडेही यूपीआय लाईट एक्स असणं गरजेचं आहे. यूपीआय व्यवहारादरम्यान, पैसे एका बँक खात्यातून दुसर्या बँक खात्यात त्वरित हस्तांतरित केले जातात. पैसे यूपीआय लाइट वरून ऑन-डिव्हाइस वॉलेट किंवा यूपीआय लाइट खात्यावर पाठवले जातात.

**पैसे पाठविण्याची मर्यादा**

यूपीआय बँक अकाऊंटहून एकादिवसात जास्तीत जास्त २ लाख रुपये ट्रान्सफर केले जातात, तर यूपीआय लाईटवरून जास्तीत जास्त ५०० रुपयेच ट्रान्सफर करता येतात, तर एका दिवसात ४ हजारांपर्यंत पैसे ट्रान्सफर करता येतात.

**-प्रा योगेश हांडगे**

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## डेंग्यू तापावर स्वत:हून करु नका उपचार, त्यामुळे तुमचा जीव येऊ शकतो धोक्यात



देशातील अनेक राज्यांमध्ये डेंग्यूचा उद्रेक सुरूच आहे. यावेळी या तापाच्या रुग्णांमध्ये विक्रमी वाढ होत आहे. दिल्ली-एनसीआरपासून पश्चिम बंगाल आणि उत्तराखंडपर्यंत डेंग्यूचे रुग्ण वाढत आहेत. काही राज्यांमध्ये रुग्णांचा मृत्यूही झाला आहे. या तापामुळे आतापर्यंत ९० हून अधिक रुग्णांचा मृत्यू झाला आहे. हॉस्पिटलायझेशनही वाढत आहे. रुग्णालयात दाखल होणाऱ्या डेंग्यूचे बहुतांश रुग्ण हे असे आहेत, ज्यांनी वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेतला नाही आणि घरगुती उपचारांच्या जाळ्यात अडकून राहिले. त्यामुळे रुग्णालयात पोहोचण्यास विलंब झाला. त्यामुळे परिस्थिती बिघडू लागते. अशा परिस्थितीत डॉक्टरांनी डेंग्यूचे निदान झाल्यानंतर स्वत:हून उपचार टाळण्याचा सल्ला दिला आहे.

यावेळी डेंग्यूमध्ये दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी प्लेटलेट्सची पातळी अचानक कमी होत असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. या काळात काही रुग्णांना तापही येत नाही. सौम्य ताप आल्यास लोक घरीच उपचार करू लागतात. परंतु बऱ्याच प्रकरणात यामुळे रुग्णाच्या स्थितीत सुधारणा होत नाही. हळूहळू परिस्थिती बिघडू लागते. काही प्रकरणांमध्ये प्लेटलेट्स वेगाने कमी होतात आणि रुग्णाला शॉक सिंड्रोम होतो. ज्यामुळे नंतर मृत्यू होऊ शकतो.

याबाबत तज्ज्ञ सांगतात की, डेंग्यूच्या तापादरम्यान काही लोक बकरीचे दूध किंवा पपईच्या पानांचा रस घेतात, परंतु यामुळे खूप नुकसान होऊ शकते. वैद्यकीय शास्त्रात असे कोणतेही संशोधन नाही, ज्यामध्ये या गोष्टी फायदेशीर असल्याचे सांगितले गेले आहे. शेळीच्या दुधापासून पोटात संसर्ग होण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत लोकांना या उपायांना बळी न पडण्याचा सल्ला दिला जातो. हे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते.

जर तुम्हाला डेंग्यूचा ताप असेल आणि तो १०० अंशांपेक्षा जास्त राहिला, तर तुम्ही ताबडतोब डॉक्टरांकडे जावे. डॉक्टर या रोगाच्या लक्षणांवर आधारित उपचार करतील. ९० टक्के प्रकरणांमध्ये डेंग्यू काही दिवसांत बरा होतो. अशा परिस्थितीत घाबरून जाण्याची गरज नाही. त्याची गंभीर लक्षणे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

**ही आहेत डेंग्यूची गंभीर लक्षणे**

उलट्या
जुलाब
हिरड्यांमध्ये रक्तस्राव
डोके आणि स्नायू दुखणे
शरीरावर फोड येणे

## कोकम : कोकणातलं हे आगळंवेगळं फळ पोटाचा 'एसी' का आहे?

महाराष्ट्रातल्या किनारपट्टीवरच्या एका गावातून फिरताना एक पाटी दिसली - कोकम सरबत २५ रुपये. या लाल रंगाच्या सरबताने माझी तहान लगेच भागवली आणि मला गार-गार वाटलं. कोकणात, फक्त कोकणात कशाला, गोवा आणि कर्नाटकच्या मुबलक आढळणाऱ्या कोकमाचं हे थंडगार सरबत त्या तापत्या उन्हात फिरताना मला अमृतासारखं वाटलं. कोकमात आम्लधर्मीय पदार्थ असतात. शरीराच्या पचनासाठी ते उत्तम असतं. म्हणूनच की काय कोकणातल्या स्वयंपाकाचा कोकम हा अविभाज्य घटक आहे. सुकवलेलं कोकम म्हणजेच आमसूल महाराष्ट्राच्या इतर भागातही स्वयंपाकात वापरतात. रात्री वारंवार लघवीसाठी उठावं लागत असेल तर असू शकते 'ही' समस्या 'पित्त झालं असेल तर कोकम सरबत पी आणि पित्तावर आमसुलाचं पाणी लाव' असे आजीच्या बटव्यातले उपाय तर अनेकांनी लहानपणांपासून ऐकले असतील. कोकमाची चव आंबटसर असते, ज्या पदार्थात घालाल त्याची चव तर खुलतेच पण त्याच्या सरबताने शरीराला एकदम थंडावा मिळतो.

कोकम सरबतात इलेक्ट्रोलाईट्स असतात ज्यामुळे शरीरातल्या उष्णतेचा समतोल साधला जातो. उष्माघातापासून वाचायचं असेल तर कोकम सरबत हा एक उत्तम पर्याय आहे. कुरुष दलाल फुड हिस्टोरियन आहेत. अन्नाच्या इतिहासाचा ते अभ्यास करतात. ते म्हणतात, कोकम फळाचा किंवा त्याच्या गराचा वापर आदिवासी जमातींमध्ये कित्येक शतकांपासून होतो आहे. त्याने जेवणाला खास अशी आंबटसर चव येते. कोकम अनेक भाज्या, आमट्यांमध्ये वापरतात. मासे शिजवताना कोकम हवंच. दक्षिण भारतीय वयंपाकात जे महत्त्व चिंचेच्या कोळाला आहे, तेच महत्त्व कोकण किनारपट्टीवरच्या स्वयंपाकात कोकमाला आहे. कुरुष दलाल पुढे म्हणतात, कोकम औषधी असल्याने त्याचा वापर आजारावर उपचार करण्यासाठीही केला जायचा. आयुर्वेद सांगतो की कोकम फळात अनेक औषधी गुणधर्म आहेत. त्याचे आरोग्याला अनेक फायदे आहेत. कोकम फळात भरपूर अँटीऑक्सिडंट असतात. व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स असतं, मॅग्नेशियम, पोटॅशियम असे अनेक महत्त्वाचे क्षार असतात. कोकम पाचक असतं आणि वात होणं, पोटात गॅस होणं, जुलाब, शरीरावर आलेली सूज आणि त्वचाविकारांवर गुणकारी ठरतं. दलाल म्हणतात, कोकम नैसर्गिकरित्या थंड असल्याने उन्हाळ्यात ते अमृत आहे.

तुप्ती भोळे पुण्याच्या भारती विद्यापीठाच्या आयुर्वेद कॉलेजमध्ये प्राध्यापक आहेत. त्या म्हणतात, कोकम डिहायड्रेशन होऊ देत नाही. कोकम स्वयंपाकात वापरतात, त्याच्या गरापासून सरबत करतात आणि सोलकढी कोण विसरेल? जिभेची रसना तृप्त करणारी सोलकढी कोकमाचा गर आणि नारळाच्या दूधापासून बनवतात. कोकमाच्या झाडाला भरपूर पाऊस लागतो. मार्च महिन्यात त्याला बहर येतो आणि साधारण एप्रिल-मे मध्ये फळ धरतं. हे फळ पिकलं की साधारण लिंबाएवढं होतं. या



फळाची तोडणी करून मग त्यापासून बी वेगळी केली जाते आणि उन्हात वाळवलं जातं. वाळल्यानंतर त्याला काळसर रंग येतो. हेच ते आमसूल. कधी कधी हे आमसूल उकळत्या पाण्यात टाकून ते पाणी आटवून त्याचा गर तयार केला जातो. हा गर जास्त दिवस टिकतो. हा गर मग नंतर कोकम सरबतातसाठी वापरला जातो. कोकमाच्या बियांपासून तेल तयार केलं जातं. हे तेल अनेक सौंदर्यप्रसाधनांमध्ये वापरलं जातं. कोकणात कोकमाचा मुबलक वापर होत असता तरी त्याचं उत्पादन मात्र कमी प्रमाणात होतं. सहसा आंब्याच्या आणि नारळीच्या बागांमध्येच कोकमाची झाडं असतात.

२०१० साली केलेल्या एक सर्व्हेमध्ये असं दिसलं होतं की कोकणात फक्त १००० हेक्टर क्षेत्रावर कोकमाची लागवड झाली होती. पण आता कोकम बियांच्या तेलाची वाढती मागणी पाहून स्थानिक वनखात्याने हळूहळू जंगलात आणि रस्त्याच्या कडेला कोकमाची झाडं लावणं सुरू केलं आहे. कोकम किंवा आमसुलाला आता देशी आणि परदेशी जेवणात स्थान मिळायला लागलं आहे. दलाल म्हणतात, सुरुवातीला कोकमाच्या लागवडीकडे फारसं लक्ष दिलं जायचं नाही. जंगलात उगवणारं फळ होतं हे. पण आता देशोदेशीच्या पदार्थांत कोकमाला स्थान मिळतंय. अनेक शेफ्स आता कोकमाचा आंबटपणा आणि त्याचा गडद रंग वापरून प्रयोग करत आहेत.

गोवा पोर्तुगिसा नावाचा रेस्टोबार मुंबईत १९८८ साली सुरू झाला. त्यांनी आता आपली दुसरी शाखा दुबईत उघडली आहे. तिथे अस्सल गोवन आणि पोर्तुगिज जेवण मिळतं. तिथे आता कोकम वापरून काही खास डिश तयार केल्या जातात. दीपा अवचट तिथल्या मालक आहेत. त्या सांगतात, आमच्याकडे सोलकढी, कोकम सरबत तर मिळतंच. त्याशिवाय कोकम जॅम, लोणचं, चटणीही मिळतात. कोकम आणि नारळाच्या दूधातलं सीफूड सुक्का मिळतं. त्याशिवाय मशरूम कोकम आणि कोकम-नारळाच्या दूधात शिजवलेले शार्क ही मिळतात. कोकम घातल्याने सीफूडला एक सुंदर चव येते आणि सीफूडचा नेहमीचा वासही जातो. दिल्लीच्या सात्विक नावाच्या रेस्टॉरन्टमध्ये निशांत चौबे शेफ आहेत. त्यांना महाराष्ट्रात शिकत असताना कोकमाबद्दल कळलं. ते म्हणतात, स्थानिक भाग सोडून इतर ठिकाणी फारसे माहीत नसणारे पदार्थ स्वयंपाकात वापरायला मला आवडतात. कोकम तसाच एक पदार्थ आहे. ते पुढे म्हणतात, कोकम वापरून काय काय करता येऊ शकतं. सूप्स, सॅलड, गोड पदार्थ, कोकम खरंच उत्तम आहे, त्याच्या चवीत विविधता आहे आणि त्याचा आंबटपणा चिंचेपेक्षा खूप वेगळा आहे. मी खूप वेगवेगळे पदार्थ कोकम वापरून करतो. जसं की जेली, बर्फाची कँडी, पेस्ट्री स्टफिंग, भापा दोई.

काही शेफ भारताबाहेरही कोकम लोकप्रिय करण्यात हातभार लावत आहेत. नंदिता गोडबोले अमेरिकेत राहातात. त्या 'मसालेदार : क्लासिक इंडियन स्पाईस ब्लेंड' हे पुस्तक लिहिलं आहे. भारतीय खाद्यसंस्कृतीवर त्यांची आधीही ६ पुस्तकं प्रकाशित झाली आहेत.

त्या म्हणतात, मी स्वयंपाकात नेहमी कोकम वापरते. अटलांटाच्या भारतीय दुकानांमध्ये मिळणारं कोकम सिरप मी दिसताक्षणी घरी घेऊन येते. मला पीच, नारळ, लिंबू आणि कोकम घालून मस्त कॉकटेल करायला आवडतं. कोकमापासून सरबतं, कॉकटेल, मॉकटेल उत्तम बनू शकतात कारण त्याची आंबटगोड चव फारच सुंदर असते. कोकमाची आगळीवेगळी चव आणि त्याचा शरीर शांत करणारा गुणधर्म पाहाता, येत्या काही काळात तापमानवाढीमुळे त्रस्त झालेल्या लोकांना याच फळाचा आसरा असणार आहे असं दिसतंय.

## किडनीला डिटॉक्सिफाय करण्यास मदत करतात 'हे' हेल्दी ड्रिंक्स



नियमितच्या लाइफस्टाइलमधील हालचालींसह शरीरातील काही फंक्शनच्या कारणास्तव शरीरात टॉक्सिन जमा होऊ लागतात. अशातच हेल्दी आयुष्य जगण्यासाठी यामधून बाहेर पडणे अत्यंत महत्त्वाचे आहे. टॉक्सिंसला फिल्टर करण्यासाठी एका हेल्दी किडनीची आवश्यकता असते. किडनी ब्लडला फिल्टर करते आणि वेस्ट मटेरियल युरियनच्या माध्यमातून शरीराबाहेर टाकते. त्याचसोबत किडनी शरीरात फ्लूड्स बॅलेन्स आणि इलेक्ट्रोलाइडचा स्तर नियंत्रणात ठेवते.

वैद्यकिय स्थिती जसे की, मधुमेह, हाइपरटेंन्शन आणि हाय ब्लड प्रेशर सारख्या काही अवस्था आहेत त्यासाठी किडनीची प्रतिक्रिया जबाबदार असते. अशातच किडनीचे आरोग्य राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पुढील काही ड्रिंक्स तुमच्या किडनीला डिटॉक्सीफाय करण्यास मदत करू शकतात.

**बीटरूट आणि ॲप्पल स्मूदी**

बीटरुटमध्ये इ१० चे गुण असतात. जे अँन्टीऑक्सिटेंडयुक्त एक उपयोगी फाइटोकॅमिकल आहे. ते युरिनमध्ये ॲसिडला वाढवतात. या व्यतिरिक्त त्यामध्ये पुरेशा प्रमाणात पेक्टिन नावाचे फायबर असतात, जे किडनीच्या आरोग्याला प्रोत्साहन देतात. ते किडनीला डिटॉक्स करुन त्याचे फंक्शन संतुलित करतात.

**ॲप्पल साइडर विनेगर ड्रिंक**

ॲप्पल साइडर विनेगर किडनीला डिटॉक्सिफाय करण्यास मदत करतात. त्यामध्ये सिट्रिक ॲसिड, ॲसिटिक ॲसिड आणि फॉस्फोरोसचे प्रमाण असते. जे टॉक्सिसला तोडतात आणि किडनीत स्टोन निर्माण होऊ देत नाहीत. योग्य प्रमाणात त्याचे सेवन केल्यास किडनीचे हेल्थ दीर्घकाळ टिकून राहते.

**गाजराची स्मूथी**

गाजरात कॅरोटीनचे प्रमाण भरपूर असते. जे कॅन्सरपासून बचाव करण्यासह किडनीतील टॉक्सिस रिमूव करण्यास मदत करतात. गाजरात असलेले फायबर टॉक्सिंसला शरीराबाहेर काढण्यास मदत करतात. अशा प्रकारे किडनी योग्य प्रकारे कार्य करते आणि ब्लडला पूर्णपणे डिटॉक्सिफाय करते. त्यामुळे शरीरात कोणत्याही प्रकारटे टॉक्सिंसचे अवशोषण होत नाही.



## केस गळतीवर रामबाण उपाय कढीपत्त्याचे तेल

आपल्या धावपळीच्या आयुष्याचा आपल्यावर आरोग्यावर थेट परिणाम होतो. त्यापैकीच एक म्हणजे केस गळतीची समस्या. ही समस्या बहुतांश महिलांना होते. केस गळतीच्या समस्येपासून दूर राहण्यासाठी विविध उपाय केले जातात. अशातच तुम्ही घरगुती पद्धतीने कढीपत्त्याचे तेल तयार करून केस गळतीच्या समस्येपासून दूर राहू शकता.

खरंतर प्रोटीन आणि बीटा कॅरोटीन युक्त कढीपत्ता हेअर फॉलसाठी मदत करू शकतात. कढीपत्ता तुमचे केस गळण्याची समस्या दूर करण्यासाठी त्याची ग्रोथ करण्यास ही मदत करतो. त्याचसोबत कढीपत्त्यात अँन्टीऑक्सिडेंट्स असतात जे स्कॅल्प आणि डेड स्किन तयार होऊ देत नाही.

घरच्या घरी असे बनवा कढीपत्त्याचे तेल

यासाठी तुम्ही एक बाउल कढीपत्ता आणि एक कप नारळाचे तेल घ्या. सर्वात प्रथम तेल गरम करून घ्या आणि त्यात कढीपत्त्याची पाने टाका. जो पर्यंत कढीपत्त्याची पाने त्यात गरम होत नाही तो पर्यंत तसचे राहू द्या. त्यानंतर तेल गाळून घ्या आणि एका बॉटलमध्ये भरून ठेवा.

**कढीपत्ता केसांना लावल्याने होणारा फायदा**

कढीपत्त्याचे तेल दररोज केसांना लावले तर केसांना पोषण मिळते. त्याचसोबत ते मूळापासून मजबूत होतात
केस सफेद होण्यापासून दूर राहता
कढीपत्त्याच्या तेलाने केसांना मसाज केल्यास ब्लड सर्कुलेशन सुधारते केसांची ग्रोथ होते
जर तुम्ही ड्राय केसांच्या समस्येचा सामना करत असाल तर कढीपत्त्याचे तेल वापरू शकता

## काल्फ मसल्सच्या 'या' एक्सरसाइजने वाढवा पायांचे सौंदर्य



बहुतांश महिला अशा आहेत ज्यांच्या काल्फ मसल्सवर जमा झालेले फॅट्स समस्येचे कारण ठरतात. यामुळे त्या स्कर्ट्स किंवा मिनीज अथवा मिडीज घालू शकत नाहीत. खरंतर पायांचे सौंदर्य वाढवण्यासाठी काल्फ मसल्सवर जमा झालेले अतिरिक्त फॅट बर्न करणे अत्यंत गरजेचे असते. अशातच पुढील काही काल्फ मसल्सच्या पुढील काही एक्सरसाइजने तुम्ही तुमच्या पायांचे सौंदर्य वाढवू शकता.

**जंप स्क्वॉट्स**

या एक्सरसाइजच्या मदतीने तुम्ही तुमचे पाय ते खांदे दुखीची समस्या दूर करू शकता. त्याचसोबत तुमची बॉडी टोन्ड होण्यास ही मदत होते. जंप स्क्वॉट्स एक्सरसाइज केल्याने शरीराचा स्टॅमिना वाढला जातो. त्यामुळे तुम्ही थकवा आणि बैचेन सारख्या समस्येपासून दूर राहता.

**सिंगल लेग स्क्वॉट्स**

ही एक्सरसाइज केल्याने आपल्याला पायदुखीच्या समस्येपासून दूर राहता येते. त्याचसोबत तुमचे शरीर लवचीक होण्यास मदत होते. शरीराला हेल्दी आणि मजबूत बनवण्यासाठी ही एक्सरसाइज फायदेशीर मानली जाते. पायांवर जमा झालेले अतिरिक्त फॅट्स यामुळे दूर होतात.

**पाइल काल्फ रेजिज**

ही एक्सरसाइज तुम्ही तुमच्या डेली वर्कआउटमध्ये सहभागी करू शकता. यामुळे काल्फ मसल्ससह आजूबाजूच्या स्नायूंची स्ट्रेंन्थ ही वाढली जाते. शरीर हेल्दी आणि लवचीक होते. या व्यतिरिक्त या एक्सरसाइजच्या मदतीने तुमचे मन हलके राहते.

**सूमो स्क्वॉट्स**

सूमो स्क्वॉट्स आपल्या शरीरातील फॅट कमी करण्यास मदत करतो. ही एक्सरसाइज केल्याने संपूर्ण वजन काल्फ्सवर येते. त्यामुळे जमा झालेले फॅट्स आपोआप बर्न होऊ लागतात. यामुळे पोटावरील चरबी सुद्धा दूर होते. त्याचसोबत शरीर लवचीक होते.

## सांधेदुखी कमी करण्यासाठी तोंडली खा

तोंडलीची भाजी खाणं शरीरासाठी आवश्यक असणार्या फळभाज्यांपैकी एक आहे. मात्र, अनेकांना ही भाजी खायला आवडत नाही. इतर भाज्यांच्या तुलनेत तोंडली या भाजीमध्ये पोटॅशियम, फॉस्फोरस, आयर्न, झिंक आणि सेलेनियम जास्त प्रमाणात असते.

**तोंडलीची भाजी खाण्याचे फायदे**



तोंडलीच्या सेवनामुळे रक्त शुद्धी होते. तसेच आपले पचन देखील सुधारते. किमान आढवड्यातून एकदा किंवा दोनदा तरी या भाजीचे सेवन करावे जेणेकरुन आपल्या लिव्हरचे कार्य व्यवस्थित चालते.

उष्णतेमुळे तोंडात येणारे व्रण घालवण्यासाठी आणि तोंड आल्यावर कच्ची तोंडली खावी. तापामुळे जर तोंडाला चव नसेल तर कच्ची तोंडली खाण्याचा सल्ला दिला जातो.

तोंडलीच्या भाजीमध्ये जवळ-जवळ ९४ टक्के पाणी असते. डायबिटीज, कॅन्सर आणि किडनीच्या आजारापासून दूर राहायच असेल तर तोंडली खाणे फायदेशीर आहे.

तोंडलीमुळे ब्लड शुगर लेव्हल नॉर्मल राहते. डायबिटीजपासून बचाव होतो. शिवाय ही भाजी कफनाशक देखील आहेत.

यातील व्हिटॅमिन ब्रेन पॉवर वाढवते त्यामुळे मेमरी चांगली राहते.

तोंडलीच्या भाजी व्यतीरिक्त त्याची पाने आणि फुले आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. तोंडली खाल्लयाने किडनीस्टोन होण्याची शक्याता होते. तसेच ज्यांना किडनीस्टोन आहे त्यांना ही भाजी खाणं फायदेशीर सिद्ध होतं.

यातील कॅल्शियममुळे सांधेदुखी कमी होण्यास मदत होते.

## किचनमधील 'हे' पदार्थ घालवतील दातातील किड

स्वच्छ दात केवळ आपले सौंदर्यच खुलवत नाहीत तर तुम्हाला दातांच्या समस्येपासून दूर ठेवतात. काही लोकांच्या दातांमध्ये काळे डाग असता. त्याला किड लागणे असे म्हटले जाते. अशामुळे तुमचा दात पोकळ होत जातो. खरंतर कॅवेटिजची काही कारणे आहेत. दात स्वच्छ नसणे, बॅक्टेरियल इंन्फेक्शन, गोड पदार्थांचे अधिक सेवन करणे, हेल्थ संबंधित काही समस्या अशी काही कारणे आहेत. दातातील किड दूर करण्यासाठी हे पदार्थ कामी येतील.

लवंग : लवंगामध्ये कॅव्हिटीच नव्हे तर ओरल समस्यांपासून दूर ठेवण्याचे गुणधर्म असतात. यामधील अँन्टी बॅक्टेरियल गुण दुखमे कमी करण्यास मदत करतात. लवंगाच्या तेलाचा वापर केल्याने किड लागण्याच्या समस्येपासून दूर राहू शकता.

लसूण : भारतीय किचनमध्ये लसूण पदार्थांची चवच नव्हे तर आरोग्यासाठी फायदेशीर असते. लसणात अँन्टी फंगल आणि अँन्टी



बॅक्टेरियल गुण असतात. त्यामुळे दात किडण्याच्या समस्येपासून दूर राहतात.

मीठाचे पाणी : दात किडणे किंवा दुखीपासून आराम मिळण्यासाठी मीठाचे पाणी तुमच्या कामी येईल. तोंडातील बॅक्टेरिया यामुळे दूर होईल. मीठाचे पाणी तोंडातील ॲसिडला हटवून पीएचचा स्तर सामान्य करू शकतो.

लिंबू : लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. यामध्ये असलेले ॲसिड जर्म्सला दूर करुन दुखणे कमी करण्यास मदत करतात. तोंडात लिंबूचा तुकडा ठेवून तो चावल्यास किंवा चुळ भरल्यास दात किडीच्या समस्येपासून दूर होण्यास मदत होते.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना विनम्र अभिवादन

लातूर : गांधी जयंती निमित्त गांधी चौक येथे अहिंसेचे पुजारी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी उमरदराज खान, अॅड. ला. रा. शेख, अब्दुल शेख, अॅड. मुश्ताक सौदागर, कदिर मणीयार, खमर पटेल आदी उपस्थित होते.


लातूर **भूकंप**

http://epaper.dainikbhukamp.com


# 'केशवराज' मध्ये महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती

लातूर : येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव,मुख्याध्यापक प्रदीप कुलकर्णी,पर्यवेक्षक संदीप देशमुख,बबन गायकवाड, पर्यवेक्षिका श्रीमती अंजली निर्मळे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन अभ्यासपूरक मंडळ सहप्रमुख धनंजय कुलकर्णी यांनी केले. संस्कार मंडळांतर्गत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्कार मंडळातील सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.



# बसवेश्वर महाविद्यालयात महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात

लातूर : महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारमंचावर माजी प्राचार्य डॉ. एम. एस. दडगे, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी आणि डॉ. श्रीराम भालेराव यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. यशवंत वळवी म्हणाले की, महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे आपण विविध महापुरुषांच्या जयंती महाविद्यालयाच्या प्राध्यापक कक्षामध्ये नियोजित विभागामार्फत पार पाडतो यामध्ये प्रत्येकाला विभागाला जबाबदारी दिल्यामुळे प्रत्येकाचा सहभाग कार्यक्रमांमध्ये असतो यामुले महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या विचाराची माहिती होते.

यावेळी डॉ. श्रीराम भालेराव यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या राष्ट्रीय कार्याचा संक्षिप्त आढावा घेऊन त्यांचा जीवन परिचय सर्वांना करून दिला. तसेच यावेळी माजी प्राचार्य डॉ. एम. एस. दडगे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संगम धाराशिवे यांनी केले तर आभार प्रा. व्यंकट दुडिले यांनी मानले.

या कार्यक्रमाला प्रा. एस. एम. पाटील, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. गोविंद पांढरे, प्रा. के. आर. बिराजदार, नामदेव बेंदरगे, विनायक लोमटे, डी. एन. कांबळे यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रो. डॉ. राजकुमार लखादिवे, जयंती उत्सव समितीचे समन्वयक प्रा. धोंडीबा भुरे, जलील सैय्यद व शुभम बिराजदार यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला जयंती उत्सव समितीचे सर्व सदस्य, महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# रेणापूर येथील माती दिल्लीच्या अमृतवाटिकेसाठी रवाना

लातूर : देशाच्या अमृत महोत्सव निमित्ताने पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या सूचनेनुसार 'मेरी माटी मेरा देश' अभियानांतर्गत रेणापुर शहरातील सर्वच प्रभागातून गोळा करण्यात आलेली माती एका कलशातून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभ हस्ते दिल्ली येथे होणाऱ्या अमृतवाटिकेसाठी रविवारी पाठविण्यात आली.

देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शूरवीर आणि स्वातंत्र्य सैनिकाच्या स्मरणार्थ देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या संकल्पनेतून मेरी माटी मेरा देश अभियानांतर्गत दिल्ली येथे राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या जवळ निर्मित होणाऱ्या अमृतवाटिकेसाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून ७ हजार ५०० मातीचे कलश आणले जाणार आहेत. त्यातून एक भारत श्रेष्ठ भारत या वचन पद्धतीचे प्रतीक असलेल्या अमृतवाटिकेची निर्मिती केली जाणार आहे.

माझी माती माझा देश या अभियानांतर्गत रेणापूर शहरातील सर्वच प्रभागातून गोळा करण्यात आलेल्या मातीचा कलश भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते दिल्लीसाठी विधिवत पूजा करून रवाना करण्यात आला. याप्रसंगी तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड, गटविकास अधिकारी सुमित जाधव, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, वसंत करमुडे, सतीश आंबेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संपूर्ण अभियानाची माहिती रेणापूर नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी मंगेश शिंदे यांनी उपस्थितांना दिली. प्रारंभी प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपाचे



तालुकाध्यक्ष अॅड दशरथ सरवदे यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

रेणुका देवी मंदिर परिसरात रविवारी झालेल्या या कार्यक्रमास भाजपाचे दत्ता सरवदे, श्रीकृष्ण जाधव, विजय गंभीरे, सचिन चेवले, चंद्रकांत कातळे, श्रीकृष्ण पवार, भागवत गीते, गोपाळ शेंडगे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, अमर चव्हाण, शिवमुर्ती उरगुंडे, शिला आचार्य, माधव गुडे, उत्तम चव्हाण, गणेश तूरूप, रमाकांत संपत्ते, संतोष चव्हाण, उज्वल कांबळे, अच्युत कातळे, राजू आलापुरे, अंतराम चव्हाण, शेख अजीम सुरेश बुड्डे, रमा चव्हाण, लखन आवळे, हनुमंत भालेराव, दिलीप चव्हाण, संतोष राठोड, गणेश माळेगावकर, नगर पंचायतीचे मंगेश देशमुख, विशाल विभुते, अभिजीत धायगुडे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासकीय रेखाकला परीक्षेसाठी महाराष्ट्रातील ८१६४७६ विद्यार्थ्यांचा सहभाग

## राज्यातून एलिमेंटरीसाठी ४४७०३४ तर इंटरमिजिएटसाठी ३६९४४२ विद्यार्थी परीक्षा देणार

लातूर : महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य कलासंचालनालयाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२३ हे ४ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर २०२३ या कालावधीमध्ये संपन्न होणार आहेत.

राज्यातून शासकीय ग्रेड परीक्षेत एलिमेंटरीसाठी ४,४७०३४ तर इंटरमिजिएटसाठी ३,६९४४२ असे एकूण ८,१६४७६ विद्यार्थी बसलेले आहेत. लातूर जिल्हातील सर्व परीक्षा केंद्रावर एकूण एलिमेंटरी साठी ७९३६ व इंटरमिजिएटसाठी ५६६६ विद्यार्थी याप्रमाणे दोन्ही परीक्षेत एकूण १३६०२ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

यशवंत विद्यालय अहमदपूर येथील एलिमेंटरी परीक्षेत ५४८ तर इंटरमिजिएट परीक्षेसाठी २८९ विद्यार्थी या परीक्षा केंद्रावर परीक्षा देणार आहेत. शालेय स्तरावर कला विषयास अनन्य साधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांमध्ये कला अभिरुची निर्माण करून सौंदर्यदृष्टी विकसित करणे, विविध कलांचा रसास्वाद घेता येणे, सृजनात्मक गुणांचा विकास करणे, कलासंस्कृती तसेच भारतीय कलापरंपरांची जोपासना करणे, पर्यावरण संवर्धना- साठी जाणीव व जागृती निर्माण करणे, राष्ट्राच्या समृद्ध व सर्वसमावेशक अशा कलात्मक, सांस्कृतिक आणि सामाजिक वारशांचा अभिमान बाळगणे अशा विविध बाबींचा विकास व्हावा या उद्देशाने कला विषय अभ्यासक्रम शालेय स्तरावर ठेवलेले आहे.

इंटरमिजिएट परीक्षेचे महत्व पहाता परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कला क्षेत्रातील विविध अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठीची संधी मिळते.इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण नसेल तर वरील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळत नाही.दहावी बोर्ड परीक्षेत सवलतीचे वाढीव गुण मिळतात. मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी ही परीक्षा उपयुक्त ठरते.

ड्रॉइंग ग्रेड परीक्षेकडे मुलांचा कल वाढताना दिसून येत आहे ही सकारात्मक बाब आहे. नकळतपणे मुलांचा अभ्यासाचा ताणतणाव कमी होण्यासाठी या परीक्षा उपयुक्त ठरतात. शिवाय बोर्ड परीक्षेत वाढीव गुण तसेच इतर विषयांच्या अभ्यासासाठी पूरक गुणांचा विकास आपोआपच होऊ शकतो.

# दयानंद महाविद्यालयात 'स्वच्छता ही सेवा' अभियान संपन्न





लातूर : येथील दयानंद कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि ५३ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून एक ऑक्टोबर रोजी स्वच्छता पंधरवाडा निमित्त 'स्वच्छता ही सेवा ' या उपक्रमांतर्गत 'एक तारीख, एक तास आणि एक साथ ' स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सदरील अभियान चे उद्घाटन दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.राजाराम पवार व दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. सदरील अभियान कमांडिग ऑफिसर कर्नल हेमंत जोशी, प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल वाय.बी सिंह, सुभेदार मेजर शंभु सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने,वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर ,कॅप्टन विजेंद्र चौधरी,लेफ्टनंट डॉ .साईनाथ उमाटे,नायब सुभेदार विष्णु कच्छवे, हवलदार अमनदिप सिंग , हवलदार राजेंदर झाला, हवलदार सचिन झारिया, बी.बी. ए.विभागप्रमुख डॉ.वैशाली सातपुते, प्रा.कल्याणी पाटील,प्रा.अक्षय पवार, आदी ची उपस्थिती होती.

उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. राजाराम पवार म्हणाले की, 'स्वच्छता ही सेवा' हे वृत्त घेऊन समाजात काम करणे गरजेचे आहे. आज समाजामध्ये प्रामाणिकपणे काम करणाऱ्याची संख्या कमी झाली,असून राष्ट्रीय छात्र सेना कॅडेटच्या माध्यमातून प्रत्येक समाजामध्ये, गावामध्ये, वस्तीमध्ये, स्वच्छतेचा जागर घालणे आवश्यक असून, प्रत्येकाने आपापल्या परीने 'स्वच्छता ही सेवा' करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त केले.

यावेळी दयानंद शिक्षण संस्थेच्या परिसरामध्ये स्वच्छ्ता ही सेवा अभियान राबवून परिसर कचरा व प्लास्टिक मुक्त करण्यात आला. कॅडेट ने स्वच्छ्ता दुत म्हणून कार्य केले हे कौतुकास्पद होते.याप्रसंगी प्राध्यापक व कॅडेट ची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# २००० रुपयांच्या नोटा बदलण्याची मुदत वाढवली, आता ७ ऑक्टोबरपर्यंत मिळेल संधी, RBI ने जारी केले नवीन परिपत्रक

नवी दिल्ली : ज्यांच्याकडे अजूनही २००० रुपयांच्या नोटा पडून आहेत, त्यांच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २००० रुपयांच्या नोटा जमा आणि बदलण्यासाठी आधीच निश्र्चित केलेली तारीख वाढवली आहे. आता ७ ऑक्टोबरपर्यंत २००० रुपयांच्या नोटा, सामान्य ते विशेष, कोणत्याही बँकेत जमा किंवा बदलून घेता येतील. यापूर्वी रिझर्व्ह बँकेने ३० सप्टेंबर ही २००० रुपयांच्या नोटा बदलून घेण्यासाठी किंवा जमा करण्यासाठी अंतिम मुदत निश्र्चित केली होती.

दरम्यान भारतीय रिझर्व्ह बँकेने १९ मे २०२३ रोजी लोकांना २००० रुपयांच्या नोटा चलनातून काढून टाकण्यासाठी ४ महिन्यांची मुदत दिली होती. जेणेकरून लोक बँकेत जाऊन या नोटा बदलून घेऊ शकतील. त्याची अंतिम मुदत आज म्हणजेच शनिवार, ३० सप्टेंबर २०२३ रोजी संपली आहे. जर तुम्ही हे काम अजून केले नसेल, तर तुम्हाला आणखी एक शेवटची संधी दिली आहे. रिझर्व्ह बँकेने एकावेळी २०,००० रुपयांपर्यंतच्या फक्त २००० रुपयांच्या नोटा बदलण्याची मर्यादा घातली होती.

# राज्यस्तरीय डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्काराने प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे सन्मानित

लातूर : राष्ट्रीय पातळीवर मानवावर होणारे अन्याय थांबवून, न्याय मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्न करणारी, प्रत्येक समाजातील घटकांचे हक्क व अधिकारांचे रक्षण करणारी संघटना म्हणजे नैसर्गिक मानवाधिकार सुरक्षा परिषद फोरम होय, या फोरम तर्फे समाजातील शैक्षणिक विभागातील कला, क्रीडा, शिक्षण इत्यादी क्षेत्रात बहुमोल योगदान दिलेल्या मान्यवरांना रविवार, दि.१ ऑक्टोबर २०२३ रोजी 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार' कर्नल गणपती श्रीनिवासन यांच्या हस्ते व गोरख देवरे, भाऊसाहेब अकलाडे आणि ईश्वर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत देऊन गौरविण्यात आले. त्यात कृषि महाविद्यालय, लातूरचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांचा समावेश आहे.



कृषि महाविद्यालय, लातूरचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांनी सुरूवातीपासूनच सामाजिक, पर्यावरणीय व सांस्कृतिक या कार्याबरोबरच त्यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी अविरत प्रयत्न केले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम घेऊन शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा गौरव म्हणून डॉ.ठोंबरे यांना धुळे येथे रविवार, दि.१ ऑक्टोबर २०२३ रोजी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण आदर्श शिक्षक या राज्यस्तरीय पुरस्काराने सहकुटुंब गौरविण्यात आले. डॉ.ठोंबरे यांच्या कृषि, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरण संवर्धन यासारख्या विविध क्षेत्रात त्यांनी राबविलेल्या अभिनव संकल्पना आणि विविध उपक्रमांची तसेच भरीव व उल्लेखनीय अशा सृजनशील कार्याची दखल घेऊन यापूर्वी डॉ.ठोंबरे यांना भारतीय कृषि व उद्यान संशोधन विकास संस्था चंदीगड पंजाब या संस्थेच्या वतीने जीवनगौरव पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आलेले आहे. तसेच त्यांना विद्यापीठाचा आदर्श प्राध्यापक पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजनेचा पुरस्कार, पर्यावरणाचा सुंदरलाल बहुगुणा पुरस्कार, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, वृक्ष मित्र पुरस्कार, देशी गोवंश लेखन पुरस्कार इ.विविध पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे. वाळवंटातून सुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती, देखणी ती पाऊले जी ध्यासपंथे चालती ! या कविवर्य बा.भ.बोरकरांच्या काव्यपंक्ती सार्थ ठरविणारे व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.बाबासाहेब माणिकराव ठोंबरे हे होय. डॉ.ठोंबरे यांची एक शिस्तप्रिय, कार्यकुशल अधिकारी म्हणून सर्वदूर ओळख आहे. सर्व वयोगटातील सहकार्यांना सोबत घेऊन जाण्याचे त्यांचे दृष्टे नेतृत्व व कौशल्य वाखाण्याजोगे आहे.

कृषि व कृषिपूरक क्षेत्रात ही प्राचार्य डॉ.ठोंबरे यांचे उल्लेखनीय कार्य आहे. त्यांनी देशी गोवंश, म्हैसवर्ग व शेळी - मेंढी पालनात जे विशेष संशोधन केले ते शेतकऱ्यांना आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने सहाय्यभूत ठरलेले आहे. राष्ट्रीयस्तरावर शेतकरी, पशुपालक विद्यार्थी यांना मार्गदर्शन करण्यासाठी शेतकरी मेळावे व चर्चासत्रे यात सक्रिय सहभाग नोंदविला आहे. तसेच दूरदर्शन, आकाशवाणी, नियतकालिके, दैनिके याद्वारे जनजागृती करून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यासाठी सातत्याने भरीव योगदान दिले आहे. आणि सातत्याने ते देत आहेत. त्यांच्या याच समाजोपयोगी, भरीव कार्याची दखल घेऊन आत्तापर्यंत डॉ.ठोंबरे यांना अनेक विभागीय व राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. डॉ.ठोंबरे यांना अत्यंत प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.इंद्रमणी, माजी कुलगुरू डॉ.अशोक ढवण, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ.उदय खोडके, संचालक विस्तार शिक्षण डॉ.धर्मराज गोखले, कुलसचिव डॉ.पी.के.काळे, ज्येष्ठ संपादक प्रा.नानासाहेब गाठाळ, माजी कुलसचिव डॉ.दिगंबर चव्हाण, डॉ.धिरजकुमार कदम, ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, रमेशराव आडसकर, प्राचार्य वसंतराव चव्हान, प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे, डॉ.अनिलकुमार भिकाणे, डॉ.हेमंत पाटील, पं.उद्धवबापू आपेगावकर, ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, वसंतराव मोरे, ऍड.माधव जाधव, ऍड.संतोष पवार, सुप्रसिद्ध लेखक सर नागेश जोंधळे, जेष्ठ कवी राजेंद्र रापतवार, पत्रकार रणजित डांगे, विनोद पोखरकर, पत्रकार दिलीप अरसूळ, प्रख्यात कवी राजेश रेवले आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्र, परिवार आणि नातेवाईक यांनी अभिनंदन करून पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सेवानिवृत्ती निमित्त दामोदर सुरवसे यांचा उप प्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी यांच्या हस्ते सत्कार

लातूर : येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील सेवक दामोदर हरीबा सुरवसे हे वयोमानानुसार शनिवारी सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा उप प्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व संत ज्ञानेश्र्वर माऊलींची प्रतिमा भेट देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी विभाग प्रमुख डॉ. अनुजा मनियार, डॉ. सिराज बादल, डॉ. अश्विनी बिरादार, डॉ. विजयालक्ष्मी माले, डॉ. अमोल डोईफोडे, डॉ. राघवेंद्र मेत्री, भांडारपाल अमोल महिंद्रकर, लिपीक नेताजी देशमुख, तानाजी जाधव, नितीन गोरडे, गजानन सोमवंशी, दिपक चाटे, चेअर टेक्निशियन संदिप भालेराव, बबन सुरवसे, शुभम भालेराव व सेवक नयुम शेख, सुभाष झुंजारे, शरद कोपनबैयने, ज्ञानेश्र्वर देशमुख, लक्ष्मण सावळकर, सोमनाथ लांडगे, उत्तरेश्र्वर गायकवाड, मनोज कांबळे हे उपस्थित होते. दामोदर सुरवसे यांनी दि. १ जानेवारी १९९४ ते दि. ३० सप्टेबर २०२३ या कालावधीत सेवक म्हणून सेवा दिली असून त्यांनी एकूण २९ वर्ष ८ महीने २९ दिवस एवढी प्रदीर्घ सेवा दिलेली आहे. सेवानिवृत्ती निमित्त दामोदर सुरवसे यांचा एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील सर्व डॉक्टर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, सेवक कर्मचारी यांनी सत्कार करुन त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.


छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते


## CHANGE OF NAME DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **MIRZA AYOUB BEGRAZAALI TO : MIRZA AYUB BAIGRAZAALI** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **MIRZA AYUB BAIGRAZA ALI** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY WIFE/ CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME :- MIRZA AYOUB BEGRAZAALI**
**NEW NAME :- MIRZA AYUB BAIGRAZAALI**
**ADDRESS :- AURANGPURA UDGIR DIST. LATUR**